
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा. वा.
दा. क्र. ५५३८

# शिदबा घायगुड्या

BVBK-0404538



म. ग्रं. सं. ठाणे
विषय बालवाङ्मय
अ. क्र. ६३२



**खूप वाचा**
**खूप शिका**

...३...

# शिदबा धायगुड्या

दत्त आपटे

BVBK-0404538

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य सहा आणे

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

पहिली आवृत्ति : १९५४

| मुद्रक | प्रकाशक |
| --- | --- |
| बा. ग. ढवळे | के. भि. ढवळे |
| कर्नाटक मुद्रणालय | कर्नाटक हाउस |
| चिराबाजार, मुंबई २ | चिराबाजार, मुंबई २ |

********************************************

चित्रकार : वि. ना. गोलिवडेकर    ब्लॉक्स : कर्नाटक प्रोसेस स्टूडिओ

********************************************

‘ काळ्याच पांढर झाल, रानकाम करून दादा, अन् आतां तुमचं लिवणं-पुसणं शिकून काय करायचं जी ? ’

मला एका शेतकरी पेशाच्या गृहस्थानें वरील प्रश्न विचारला होता आणि तुम्हांपैकीं सर्वांचाच हा सवाल असेल, नाहीं ?

एका दृष्टीनें खरं आहे तुमचं म्हणणं.

लोक भाषणं ऐकवतात.

हरिदास, पुराणिक, कथापुराणं सांगून जातात.

थकल्याभागल्यानंतर जिवाला एवढी करमणूक, माहिती झाली, म्हणजे झालं !

वर्तमानपत्रं, पुस्तकं वाचून काय करायचं आहे ? आणि आतांपर्यंत वाडवडील वाचत नव्हते म्हणून त्यांचं काय नडलं होतं ?

वर वर दिसायला हेंही खरं आहे.

जमिनीची मशागत होते, पाऊसकाळ येतो, पेरण्या-कोळपण्या होतात, खळीं पडतात, धान्य मळून घरीं येतं. गुरंढोरं पाळलीं जातात, दूधदुभतं निघतं आणि असे हे सर्व व्यवहार कसे चोख चालले आहेत पिढ्यानपिढ्या. ह्यासाठीं लिहितांवाचतां आलं नाहीं म्हणून कोणाचंच नडलं नाहीं.

त्याचं असं आहे.

तुम्हांला वाटतं नडलं नाहीं. पण नडत होतं.

आपलं नडत आहे हेंच कळत नव्हतं, म्हणून नडत नाहीं असं वाटत होतं झालं.

तोंडी व्याजाचा दर एक, कर्जाच्या रकमेचा आंकडा एक, लेखांत व्याजाचा दरही निराळा आणि रकमेचा आंकडाही निराळा. असं होत होतं कीं नाहीं ?

अशा हिशेबांत तुमच्या जमिनी गेल्या आहेत का नाहींत ?

हा झाला जुना जमाना.

राव, मताला तरी जातां.

नांव वाचायला येत नाहीं, म्हणून चित्रापुढं फुली करावी लागते ना ?

आणि फुली का करायची ? निवडून का जायचं ? निवडून तरी कुणाला द्यायचं ?

सांगा !

हा सांगतो म्हणून, हा जातवाला म्हणून, हा आमिष दाखवतो म्हणून, मत देतां कीं नाहीं ?

आणि मग समदा घोळ झाला म्हणून हाकाटी करतां कीं नाहीं ?

लिहायला, वाचायला यायला लागलं म्हणजे साऱ्याचा उलगडा होतो राव ! मत देऊन निवडून आणलेलीं माणसं

राज्य करतात आपल्यावर ! मग राज्य करणारा माणूस कसा असावा, तो राज्यावर आल्यावर काय करणार आहे, ह्याची सारी माहिती आपल्याला वाचायला मिळाली म्हणजे मग भीड पडत नाहीं. माणसं शहाणीं झालीं कीं राज्यकारभार सुधारतो. म्हणून 'लोकशाही' राज्यांत माणूस शहाणा पाहिजे आणि लिहिण्यावाचण्यानं मनुष्य शहाणा होतो हें तरी खरं !

मग आतां वय झालं म्हणून कसं भागेल. शेतीभातींत सुधारणा होत आहेत.

एकाच एकरांत पूर्वींच्या चार-पांच पट धान्य पिकविण्याच्या पद्धति निघाल्या आहेत. नवीन नवीन कायदे होत आहेत. सुधारणा होत आहेत.

पण रोजच्या रोज ही सारी माहिती तुम्हांला येऊन सांगत बसणार कोण ?

तुमची संख्या तेहेतीस कोटींच्या घरांत. शिकलेलीं माणसं तीन कोटि. तीही आपापल्या पोटापाण्यामागें लागलेली.

मग ती येणार केव्हां आणि माहिती देणार केव्हां ?

पण वरचे आंकडे तरी कळले का ?

शिकलांच नाहींत राव न् काय ? तेहेतीस कोटि, तेहेतीस हजार आणि तेहेतीस लक्ष समदंच सारखं !

बारा माणसां मागें अवघा एक माणूस शिकलेला आहे. अकरा अडाण्यांत एक बारावा शहाणा ! असा हिशेब सारा देशभर पसरलाय !

आतां सांगा लोकांचं राज्य म्हणजे लोकशाही, होय कीं नाहीं ?

तुमच्या नेहरूंना, महात्मा गांधींना लोकशाही राज्य पसंत आहे.

पण लोकशाही राज्य अडाणी राज्य होऊन चालेल का ?

माणसं शिकलीं, शहाणीं झालीं, तर त्या लोकांचं राज्य चांगलं राहील का अडाण्यांचं ?

मग राव शिका !

शहाणे व्हा ! !

अन् वाचा तुमच्या दोस्ताची, ही शिदबा धायगुड्याची गोष्ट ! ! !

पुस्तकांचा समुद्र पसरलाय् राव ! रोज नवी माहिती.

रोज नवी गंमत.

शिकावं तेवढं थोडंच वाटतंय्.

फायदा होतोय्.

राम ! राम ! !

दत्त आपटे

सांगली, हनुमज्जयंति, १८-४-५४

# शिदबा

# ॐ धायगुड्या



गोंद्या अंगणांत पडलेल्या एका लाकडाच्या ओंडक्यावर उगीच बसला होता.

थप् थप् करून भाकरी बडवून, थप् करून ती तव्यावर टाकणारी त्याची धाकटी बहीण काशी त्याला तेथून दिसत होती.

चुलीजवळच, फाटक्या वाकळीवर, हिंवतापानें बेजार झालेली त्याची आई हातापायांचें मुटकुळें करून पडली होती.

चुलींत कोंबलेल्या चिपाडांचा लालभडक जाळ छपरींत उजेड पाडीत होता.

छपरीच्या दुसऱ्या टोकाला गंगी गाय डोळे मिटून रवंथ करीत बसली होती.

गोंद्याला वाटलें गंगीच्या मिटल्या डोळ्यांतून पाणी येतें आहे. तिच्या कासेखालचे खोंड, त्याच्या बापानें — शिदबा धायगुड्यानें — दोनच दिवसांपूर्वी शेजारगांवच्या





बाजारांत कोणाला तरी विकून टाकले होते. त्या वेळीं काशी मुळुमुळू रडली होती. गोंद्या आडवा आला होता. लक्ष्मी — त्याची आई — 'नग ! नग जी !' म्हणून पडल्या पडल्या कळवळली होती; पण शिदबानें खेचून खोंड बाजाराला नेला होता आणि मग रात्रीं तो परत आला, तो झोकांड्या खात व रुपये खुळ खुळ वाजवीतच ! बाजारांतून येतांना तो चांगली मोघाभर ताडी ठासूनच आला होता.

बसल्या बसल्या गोंद्याला हें सारें आठवत होतें. अंधार दाटूं लागला. समोरून जाणा-येणारीं माणसें–जनावरें सावल्या सरकल्याप्रमाणें दिसूं लागलीं. कुट् कुट् करून एक भला मोठा उंदीर गोंद्या बसलेला ओंडकाच कुरतडूं लागला, पण गोंद्याचें लक्षच त्याच्याकडे गेलें नाहीं.

"काऽर ल्येका वाडुळ बसलायास ?" येसू पाटलानें जातां जातां त्याला हटकलें; पण तरीही तो गप्पच बसला.

आणि मग डुलत, झोकांड्या खात, लावणीची तान सोडीत येणारा त्याचा बाप त्याला अंधुक अंधुक दिसूं लागला. त्याच्या हातांत कसलें तरी टिकारणें होतें आणि धोतराचा सोगा सुटला होता.

"का ऽ र ऽ भडवि ऽ च्या असा का जंगमाच्या मुडद्याऽवानी बसलायास ?"





....१०

शिदबानें जवळ येतांच बोबड्या शब्दांनीं पोराला टापरलें. त्याच्या तोंडाला आंबूस घाण येत होती. ताडीबरोबर चघळलेल्या आळल्या मिरच्याभज्यांनीं त्याची जीभ हुळहुळत होती.

'ऊऽ इऽऽ क्!' त्यानें एक जोरांत उचकी दिली आणि गोंद्याच्या नाकांत ताडीची आंबूस घाण शिरली. पोरगा धडपडून ओंडक्यावरून उठला आणि छपरीकडे धावला.

शिदबाच्या आरडण्यानें लक्ष्मी खडबडून उठली व कुडाला टेकून कपाळाला हात लावून बसली. गंगीनें डोळे उघडून शिदबाकडे एकदा मारक्या नजरेनें पाहिलें.

आणि मग कारण नसतांना शिदबानें खणाखणी मांडली! टिकारण्यानें काशी-गोंद्याला धोपटी घातल्या. पोरांच्या आरडण्यानें गांव गोळा झालें. 'योऽ भाड्या पोराबाळांचं वाटोळं करणार!' म्हातारी जाधवीण उसळून म्हणाली.

शिदबा धायगुड्याचें शेत म्हणजे, एका टेकडीच्या पायथ्याशीं, रेलगाडीच्या रुळालगत असलेला जमिनीचा एक लहानसा तिकोनी तुकडा होता.




शेताच्या एका कोपऱ्यांत तारेचा एक लोखंडी खांब उभा होता. खांबावर असलेल्या तारांमधून पुण्या-मुंबईचीं माणसें एकमेकांशीं बोलतात, असें येश्या पाटलानें काशी-गोंद्याला सांगितलें होतें.

काशी ह्या खांबाला कान लावून हें बोलणें ऐकण्याचा प्रयत्न करी पण तिला नुसताच सऽळ सऽळ असा आवाज ऐकूं येई.

गोंद्या फार करामती ! तो खांबावर चढून पाळथ्या कपाला गुंडाळलेल्या तारांनाच कान लावण्याचा प्रयत्न करी; त्यालाही गुंऽईऽ आवाजापलीकडे शहरगांवच्या माणसांचें कांहींच बोलणें ऐकावयास मिळत नसे.

गंगी शेतांतील गवत कुरतडीत हिंडतां हिंडतां ह्या पोरांकडे अधून मधून पाही. तिचें, तिला राखुळीला आणणाऱ्या ह्या पोरांवर फार प्रेम होतें. शिदबा सारें दूध पिळून घेऊन, तिच्या वासराची उपासमार करील



म्हणून काशी, नाहीं तर गोंद्या हळुच वासरूं सोडून देत व तें हुंदाड्या देत पिऊं लागलें म्हणजे मजेनें पाहात बसत. गंगीला हें आठवलें म्हणजे ती कौतुकानें त्यांच्याकडे येई व प्रेमानें त्यांना ढुशा मारी. त्यांच्या अंगावर मान घाशी.

कित्येक वेळां ती चरणें सोडून बसकण मारून, डोळे मिटून विचार करीत बसे.

पोरें तिच्या राखणीला असत. ती रुळावर जाईल म्हणून त्यांना भीति वाटे; कारण टेकडीच्या पोटास असलेल्या भगदाडांतून फों ऽऽ करीत येणारा तो प्रचंड लोखंडी सर्प शेताजवळून जेव्हां धाड् धाड् करीत जाई तेव्हां त्यांनासुद्धा भीतीनें हादरा बसे. गंगीनें पहिल्या दिवशीं टुण्कन उडी मारून शेतभर केलेली धावपळ त्यांना आठवे. बरें तर बरें, रुळाकडेला तार होती, नाहींतर गंगी केव्हांच त्या धुडाखालीं सापडायची!

आतां तिला काय नि काशी-गोंद्याला काय सवय झाली होती. गंगी आतां खुशाल गाडीकडे पाहात बसे. खिडक्याखिडक्यांतून तोंडें काढून बसलेले रंगीबेरंगी स्त्रीपुरुष काशी-गोंद्याला बाहुल्यांप्रमाणें वाटत. त्यांना वेडावण दाखविण्याचा मोह त्यांना होई पण छाती मात्र होत नसे त्यांची तसें करण्यास.

ही गाडी आपला लोखंडी रस्ता सोडून इकडे तिकडे जात नाहीं, ही आतां तिघांचीही खात्री झाली होती. त्यामुळें कित्येक वेळां अगदीं लगत उभे राहून ते तिची मजा पाहात.



नेहमींप्रमाणें हीं तिघेंही आज शेतावर आलीं होतीं. ऐन दुपारचें ऊन झगमगत होतें. बाभळीच्या झुडपाझुडपांत दडलेले रातकिडे कीऽर्रऽ असा कर्कश आवाज घुमवीत होते.

सावलीला काशी-गोंद्यानें न्याहरीचें फडकें सोडलें व जवळच बसलेल्या गंगीच्या पुढ्यांत भाकरीचा एक कोरका फेकला.

सायंकाळ झाली. सावल्या लांबल्या आणि गंगीनें घराची वाट धरली. पोरेंही फुपाटा उडवीत तिच्या मागून चालूं लागलीं.

घरची वाट धरतांना पोरांचीं पावलें जड झालीं. आईला कडू गोळ्यांचें औषध आणण्यासाठीं बापानें सकाळीं आपणांस चवली दिली नाहीं ह्याची याद गोंद्याला आली. कोरड्यास तिखट झालें म्हणून बापानें आपणांस पिटल्याची काशीला आठवण झाली. पण बोललें नाहीं कोणीच! तिघेंही पाय ओढीत घरीं चाललीं होतीं.

शिदबाच्या बोटभर शेतांत पोट न भरल्यानें गंगीनें एकदा पाटलाच्या शेतांत मुसंडी मारली होती; पण येशानें तिला बदाड, बदाड बदडलें होतें. तिची पाठ दोन दिवस ठुळठुळत होती. काशी-गोंद्यानें तिला खूप आंजारलें गोंजारलें. येशाला शिव्या घातल्या पण उपयोग काय?

आपला मालक दूध पिळतो पण वैरणकाडीची सोय पाहात नाहीं, ह्याबद्दल तिला मनस्वी राग येई. पोवळ्या खोंडाची आठवण झाली म्हणजे ती कावरीबावरी होई, ती शिदबावर चिडे पण बोलून चालून मुकें जनावर. करणार काय ती विचारी ?

अशा ह्या विचारतंद्रींतच कडमडत तीं तिघेंही छपरीजवळ येऊन पोचलीं.

छपरांत अंधार होता. चिमणींत तेल नव्हतें. दिवळींत अगीनकाडीची रिकामी पेटी होती.

गोंद्यानें गंगीला अंधारांतच धडपडून दावें लावलें. काशीनें जाधविणीकडून, शेणकुटावरून दोन निखारे आणले.

चगळ, चोथा, काटकुट्या, चिपाडें गोळा करून तिनें चूल पेटवली.

चुलीच्या जाळाच्या उजेडांत, मुटकुळें करून पडलेली लक्ष्मी तिला दिसली.

"येऽ आऽईऽ" करून काशीनें तिला हाक मारली. "वाऽईच पानी देऽग" लक्ष्मी इवळत म्हणाली. काशीनें तिला पाणी दिलें आणि शिदबा सैतानासारखा मुजोरी करीतच घरीं आला.

शिदबा धायगुड्याला वाटे, आपलें दैवच उफराटें आहे. शेजाऱ्यांचीं शेतें पिकत पण ह्याची जमीन दड्ड, हरळी तरवडानें बुजबुजलेली.

शेजाऱ्यांच्या गोठ्यांत गुरेंढोरें हंबरत तर त्याच्या छपरांत असलेल्या दोन शेपटांतलें एक खोंडच त्याला गमवावें लागलें आणि राहिलेली गंगी गाय उपासमार होऊन भाकड बनत चालली.



बायकोनें अंथरूण धरलें, तर पोरें चिंध्या गाळींत दीनवाणीं भटकूं लागलीं.

नवटाक, दोन नवटाक ताडीसाठीं चार दिडक्या मिळण्याची त्याला मारामार पडूं लागली. तशांत सरकारी कायद्यानें तर त्याच्या कपाळांत दगड पडला. चोरटी ताडी फारच महाग पडूं लागली. त्याला वाटे लोक 'ताडी पितों' म्हणून उगीच बोंब टाकतात आपल्या नांवानें. तो दैवावर चिडला, सरकारवर चिडला आणि गांवकऱ्यांवरही चिडला.

"ह्यांच्या बाऽनें पैशे मोऽजल्यात! पेऽनार! पेऽनार! मी काऽय बी पेनार!' असें बडबडून तो साऱ्यांवर खंडा केल्याच्या फुशारकींत घरीं येई.

* *



तांबेरलेले डोळे घेऊन शिदू धायगुड्य छपरांत विडी ओढीत बसला होता.

त्याच्या डोक्यांत कसला तरी विचार चालला होता. थोड्या वेळानें तो उठला व न बोलतांच चालूं लागला. पोरें जागीं झालीं आणि बाप घरीं नसल्याचें पाहून जरा चरकलीं! बाप इतक्या लौकर उठून बाहेर पडल्याचें त्यांनीं एकदांच पाहिलें होतें आणि त्यानंतर दोनच दिवसांत पवळ्या खोंड नाहींसा केला होता त्यानें! आज ही दुसरी खेप होती.

काशी-गोंद्याला चिंता लागली, तीं दोघेंही ओढ्याकडे गेलीं. तीं परत आलीं तेव्हां शिदू हराम्याबरोबर बोलत होता. पोरांना बघतांच दोघांनींही आपलीं थोबाडें बंद केलीं.





....१६

थोड्या वेळानें हशम्या परत जाण्यास निघाला. त्यानें पचकन् एक लालभडक गुळणा काशीनें सारवून नितळ केलेल्या जमिनीवर टाकला व जाकिटांतून एक भडक रंगाचें फडकें काढून तोंड पुसलें.

हशम्या मुलाण्याचें रामपाऱ्यांतील आगमन लक्ष्मीला अशुभ वाटलें. तिचा आजारानें काळवंडलेला चेहेरा अधिकच काळवंडला.

शनिवारचा दिवस होता.

शिदबा पोरें उठण्याच्या आधींच सकाळीं लौकर उठला व गंगीला घेऊन 'हैक ! हैक !!' करीत बाहेर पडला. पोरें उठलीं.

त्यांना छपरींत शिदबा दिसला नाहीं. गंगी दिसली नाहीं.

तीं बिचकलीं. आखा दिवस चिमणीसारखीं बारीक तोंडें करून बसून राहिलीं.

संध्याकाळीं शिदबा परत आला. त्याचा चेहेरा भडकला होता. अंग धुळीनें भरलें होतें. गंगीही हैराण होऊन त्याच्याबरोबर परत आली होती. तिची चांगलीच कावड निघालेली दिसत होती. शिदबा वळवळत



होता पण बोलत नव्हता. आपण कोठें गेलों होतों, कां गेलों होतों, ह्याचा थांगपत्ताही कोणास लागूं देण्यास तो तयार नव्हता. पोरांना कांहींतरी शंका आली आणि त्यांचा जीव कासावीस झाला.

शिदबानें गाय बाजाराला नेली होती, पण ती विकली गेली नव्हती.

शेतकऱ्यांपैकीं ती कोणींच घेतली नाहीं, कारण शिदबानें सांगितलेली किंमत त्यांपैकीं कोणालाच पटली नाहीं. खाटकांनीं किंमत देऊं केली, पण गाय खाटकाला विकण्याची छाती शिदबाला झाली नाहीं. हशम्यानें खूप मध्यस्थी केली. पण शिदबाला धाडस झालें नाहीं. तरी हशम्यानें दोन रुपये इसारत कोंबलीच त्याच्या हातांत. येतांना रामोशांच्या वस्तीवर शिदबा ते रुपये घालवून कांहींसें पिऊन आला होता.

काशीनें आणि गोंद्यानें मात्र हाय खाल्ली त्या दिवसापासून ! गंगीबद्दल त्यांना काळजीही वाटूं लागली. कोणत्याही घटकेला गंगी नाहींशी होईल ह्या धास्तीनें पोरें भेदरून गेलीं. दोन दिवस झाले. शिदबा वारंवार भडकूं लागला. संध्याकाळीं वळवळ करूं लागला. भरपूर पैसे मोजल्याशिवाय त्याला चोरून ताडी देण्यास कोणी तयार नव्हतें ! तो भांडण काढूं लागला. पोरांना ठोकाठोकी करूं लागला. मध्यें पडणाऱ्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना आईबहिणीवरून शिव्या घालूं लागला. शनिवारची वाट पाहूं लागला.



पण शुक्रवारींच हशम्या मुलाणी, एका खाटकाला घेऊन त्याच्या दारीं आला.

हशाम्याच्या मध्यस्थीनें कुजबूज होऊन सौदा बरा ठरला. संध्याकाळीं चिकार ताडी पिण्यास मिळण्याची आशा शिदबाला वाटूं लागली. भुकेनें वखवखलेल्या पोरांना गोडधोड खाऊ घालण्याच्या लंब्या बाता तो मारूं लागला. गंगीचा सौदा पटविण्याचा त्यानें निश्चय केला.

काशी-गोंद्या रडूं लागलीं. रोजगारास जाऊन पोटाला मिळविण्याची भाषा करूं लागलीं. लक्ष्मी कांहींच बोलली नाहीं पण तिच्या डोळ्यांतून पाणी झिरपूं लागलें.

गंगी कावरी बावरी होऊन पाहात होती.

"रडाया काऽय झालं गऽ दाल्ला म्येला नाऽय अजून!" शिदबानें लक्ष्मीला तडकावलें.

"खायाला कार झालीया ही भाकड गाय अन् पैकावी चांगला येतूया!" हशाम्यानें साळसूदपणानें सुचविलें. "मला नग ही घासाघीस. च्याऽयला ह्यो हाडाचामड्याचा ढीग घेऊन पैका गिनायचा आणि ही बोंबाबोंब ऐकायची. माझ इसारतीच पैस टाक हशाम्या; मी जातों कसा!" खाटीक तुमान सावरीत जाण्याचा आव आणून म्हणाला.

आणि मग शिदबा भायगुड्या पिसाळला. त्यानें तोंड सोडलें. बायका-पोरांचा उद्धार केला व शेवटीं तो चेकाळून ओरडला, "इकनार! इकनार! कोन भडविऽच्चा मला अडवतुया त्येच पघतोंऽ! तंगडीच तोडतों एक्येकाची!"

खाटकाला अवसान आलें. त्यानें बेगुमानपणानें पुढें होऊन गंगीचें दावें सोडलें. तिला ओढ खातांना पाहून हशाम्यानें तिच्या पाठींत दोन-चार धोपाट्या घातल्या.



"तटती ऽया सटवी !" तांबडा गुळणा टाकून तो म्हणाला. काशीनें गंगीच्या गळ्याला मिठी मारली. ताडकन् शिदबानें तिला एक टिकारणें हाणलें. पोरगी कासावीस झाली.

गंगेऽ गंगेऽऽ करीत गोंद्या आडवा आला. त्यालाही शिदबानें बकोटीला धरून एक टोला घातला.

पोरें धाय मोकलून रडूं लागलीं. गंगी, हशम्या, शिदबा, तो खाटीक असें सारें लटांबर निघालें. दूर दूर जाऊं लागलें आणि बारीक बारीक होत होत शेवटीं बाजारगांवच्या वाटेवर दिसेनासें झालें.

पोरांनीं मुटकुळें करून स्फुंदत पडलेल्या लक्ष्मीच्या अंगावर घालून घेतलें व हमसा-हमशीं रडण्यास सुरुवात केली.

शिदबा रात्रीं परत आला तो टेऽर बनूनच. येतांच भाकर तुकडा न खातां पेंगळून पडलेल्या बायकोपोरांना त्यानें धारेवर धरलें. मारपीट केली. "अऽक्षी दमून आऽलों तर जेऽवाण तयार नाहीं !" त्यानें तक्रार केली.

धायगुड्याचीं पोरें सकाळीं लौकर उठलीं ; पण छपरांत त्यांची गंगी गाय कोठें होती ?

वाईट तोंडें करून तीं बाहेर पडलीं व शेताकडे जाऊं लागलीं. आपण आज शेताकडे कां जातों आहोंत हेंच त्यांना कळेना !

"वाइच सरमाड गोळा करून आणाऽ रेऽ पोरांनो !" नुकताच उठलेला शिदबा तांबरलेल्या डोळ्यांनीं पोरांकडे पाहात ओरडला.

काशी-गोंद्या खालीं माना घालून मुकाटवाणीं चालूं लागलीं आणि वाटेंत त्यांना हशम्या मुलाणी आडवा आला.



“ हशमसाब, गंगी कुटाऽय व्ह ? ” काशीनें त्याला कळवळून विचारलें.

“ गंगी व्हय ? अगीन गाडींत बसून म्हमईला गेली जणूं ! ”

“ कशाऽपाई ? ” गोंद्यानें आऽ वासून आश्चर्यानें विचारलें.

“ साऽयबाच्या पोटांत व्हायाला रऽ ! तुझ्या बाऽला ताडी पेयाला हवी नव्ह ? ” खीऽखी हसून हशम्या मुलाणी म्हणाला. पोरांचें काळीजच फाटलें.

डोळे पुशीत पुशीत त्यांनीं शेताचा रस्ता धरला.

गोंद्या तारेच्या खांबाच्या तळाशीं उताणा पडला होता. तोंडावर बडवणाऱ्या उन्हाच्या चपाट्याची त्याला फिकीर वाटत नव्हती.

पुण्या-मुंबईचीं माणसें तारांतून एकमेकांशीं बोलत होतीं. पण तें बोलणें ऐकण्यासाठीं गोंद्या खांबावर चढला नाहीं कीं काशीनें खांबाला कान दिला नाहीं.

त्यांच्या नजरा शेतभर फिरत होत्या, पण त्यांत चरणारी गंगी त्यांना कोठेंच दिसत नव्हती.

त्यांनीं जळणकांटूक गोळाच केलें नाहीं.

" गंऽगेऽऽ ! " काशीनें हंबरडा फोडला.

गोंद्या चमकून कुशीवर वळला व तिच्याकडे पाहूं लागला.

इतक्यांत फोंऽऽऽ करीत टेकडीच्या पोटांतून लोखंडी साप बाहेर आला.

गाडीला सारेच उघडे लोखंडी डबे होते.

त्यांतून ठेचून गुरें भरलेलीं होतीं.

त्यांत साहेब नव्हते. मडमा नव्हत्या. रंगीबेरंगी माणसें नव्हतीं.

गोंद्या ताडकन् उभा राहिला.

काशीही उभी राहिली.

त्यांना वाटलें, ह्या जनावरांच्या दाटींत आपली गंगी गाय उभी आहे.

त्यांच्या नजरा घारीसारख्या भिरभिरूं लागल्या. डब्यांतून गायी, म्हशी, बैल केविलवाण्या भकास मुद्रेनें दाटीवाटीनें उभे होते.

" गंगेऽऽअऽ ! " काशीनें हाक दिली.

" गंऽगेऽऽअऽ ! " गोंद्यानें टाहो फोडला.

खट् कड् खट् कड् करीत गाडी चाललीच होती, ती उभीच राहीना.

सारीं जनावरें त्या लोखंडी सापळ्यांत सापडून चाललीं होतीं. काशीला गाडीचा राग आला.

" थूऽ थूऽऽ रांड ! " ती गाडीकडे पाहात रागानें थुंकली. गोंद्याला



म्हमईच्या साहेबांचा भयंकर राग आला. "थू ऽ ल्येकांनो!" तो मुठी वळून ओरडला. त्यानें दांतओठ खात एक दगड गाडीवर भिरकावला आणि मग त्याचें सर्व अंग लुलें पडलें.

भांऽऽ करून त्यानें भोकाड पसरलें व नित्राण होऊन धाडकन् तो मातींत कोसळला.

काशी फाटक्या परकरानें डोळे पुशीत त्याच्याजवळ बसली.

संध्याकाळीं तीं तशींच हात हालवीत घरीं परतलीं.

पोरें घराकडे आलीं.

दारापुढें ही गर्दी होती!

तींत हशम्या होता, काल आलेला त्याचा दोस्त तो कसाई होता. येश्या पाटलाचा बाप बाळा पाटील होता. एक शिपाईही होता आणि शेजारीपाजारीही होते.

शिदबा खालीं मान घालून शरमून बसला होता. "हाणा दोन जोड मुड्याला!" जाधवीण कडाडत होती. पोरें बावचळलीं. त्यांना कांहीं कळेना. तीं कावरींबावरीं होऊन इकडे तिकडे पाहूं लागलीं.

आणि छपरींत त्यांना दाव्याला बांधलेली गंगी दिसली.

"गंगेऽ" करून त्यांनीं छपराकडे धाव घेतली व तिच्या गळ्याला मिठी मारली.



गंगी त्यांना प्रेमानें चाटूं लागली.

त्याचें असें झालें होतें.

बाळा पाटलानें शिदबाची गंगी तालुक्याच्या गांवांत ओळखली. तरणी गाय खाटकाकडे पाहून त्याला शंका आली. त्यानें खाटकाला हटकलें व चौकी दाखविली.

पोलीस पाटलानेंच हें लटांबर आणल्यानें फौजदारानें खाटकाला दम भरला व गाय परत करण्यास सांगितलें. एक पोलीस शिपाईही बरोबर दिला व हें सारें प्रकरण शिदबाच्या घरापुढें हजर झालें.

"काऽर मुलाण्या, ही एजंटी करतोस व्हय ? सुडकाळीच्या पांढरी भैर काढून लावीन !" बाळा पाटलानें हशम्याला दम दिला.

"नाय बा, शिदबा इकायची मंगाला म्हनून मीं त्याला गिऱ्हाइक दावलं." हशम्या साजूकपणानें म्हणाला.

आणि मग सतरा जणांचीं सतरा तोंडें वाजूं लागलीं. खाटकानें, दिलेल्या पैशाची आशा सोडून हळूच चोरपावलानें सूंऽबाल्या केल्या.

रात्रीं आठला मारुतीच्या देवळांत बाळा पाटलानें पंच कमिटी बोलावली आणि हशम्याला व शिदबाला हजर राहाण्यास फर्मावलें व मंडळी पांगली.

गंगी परत आल्यानें पोरें हुराळलीं होतीं. लक्ष्मीचा चेहेरा उजळला होता.

मारुतीच्या देवळापुढें एक पिंपरीचें झाड होतें. भोवतीं पार होता. रात्रीं गांवकरी ह्या पारावर बसून बिड्या पीत. पानतंबाखूचा फडशा पाडीत

आणि थट्टामस्करी करीत. पांड्या गुरव त्यांना तबलाही ऐकवी कधीं कधीं आणि कळत नसून ही मंडळी त्याचें धा कीट धाऽ मान डोलवीत ऐकत.

चव्हाणाचा शिरप्या जरा 'शर' गांवचं पाणी प्याला होता. तो एखाद्या वेळीं म्हणे, "पांडबा शाई झडलीया जणू, यो तबला वाजतुया का डफ वाजतुया त्येच कळत नाय!"

रोजच्याप्रमाणें आजही हा फड जमला पण आज गप्पांना शिदबाचा विषय होता.

आणखी थोडक्या वेळांत पंचकमिटी भरणार होती.

पांड्या गुरव ठाणवाईत दिवा लावून देवळाची झाडलोट करीत होता. बैठकीची सोय लावीत होता.

पुनवेचा चांद चांगला कासराभर वर चढल्यावर बैठक जमली.

हशाम्या आणि शिदबा चोरासारखे उभे होते.

"शिदबा, तुझें ख्वांड कुटाय?" पाटलानें विचारलें.

"ढेबेवाडीच्या पाटलाकडे!" शिदबानें अवसानांत उत्तर दिलें.

"सांगावा देऊन इचारूं का?" म्हातारा रामा न्हावी म्हणाला.

"अन् नग कुनीं म्हणलया!" शिदबा जोरांत होता.

"हाय जणू तत!" कोणीसें म्हणाले आणि शिदबा शेर बनून इकडे तिकडे पाहूं लागला.

"गंगी गाय कशापाई विकली व्हतीस?"

"पैक्या पाई!"



" नशापाणी करतोस होय ? सरकारी कायदा माहीत नाहीं तुला ?" मास्तरनीं खडसावलें.

" कोन म्हनतया ? "

" म्हाताऱ्या जाधविणीला बोलावूं का ?" मास्तरनीं खडसावलें आणि शिदबा चूप झाला.

" अन् तूं र हशम्या, गांवचीं जनावरं काढून लावतुयास व्हय ?" पाटलांनीं हशम्याला हटकलें.

" नाऽय बा ! माज्या गोठ्यांत गुरंढोरं हैत ! गायब्री हाय, पोरंबाळं दूध पित्यात अन् मी कशापाई असला वंगाळ धंदा करूं जी ?" हशम्यानें आपली बाजू मांडली.

" काय सुकाळीचा गोड बोलतुया ! " कोणीतरी म्हणालें.

" शिदबा, तूं नशापाणी करतोस ! शेताकडे, बायकापोरांकडे, आपल्या जनावरांकडे तुझं लक्ष नाहीं. तूं गांवची अब्रू खराब करतोस असं आमचं म्हणणं आहे. " मास्तरनीं सुनावलें.

" हशम्या, तूं आपलीं गुरंढोरं सांभाळून आहेस, पण शिदबाच्या गायीचा सौदा ठरवून चार पैसे मिळवण्याचा तुझा बेत होता तुझ्यामुळें त्याला नशापाणी करण्यास सवड मिळाली असं आमचं म्हणणं आहे ! " मास्तरनीं हशम्याला चमकावलें.

" देवांनीं कसूर माफ करावी एकबार ! " हशम्या खाका वर करून मोकळा झाला आणि मग शिदबाचेंही अवसान ढासळलें. पंचांनीं थोडा वेळ चर्चा केली आणि मग मास्तरांनीं पंचांचा निकाल सांगितला.

" शिदबा, मृगाला दोन महिने अवकाश आहे. तेवढ्या वेळांत रेलगाडी-कडची तुझी जमीन झाडून स्वच्छ झाली पाहिजे. हरळी तरवड साफ निघून, नांगर-कुळव फिरून जमीन लोण्यासारखी मऊ पडली पाहिजे. हशम्यानें त्याला कुळव, काठी, बैल, ह्यांची मदत केली पाहिजे. पंचांनीं जमीन नापास केली तर दोघांनाही गांवकरी मंडळी आपल्यांत घेणार नाहींत. त्यांनीं आपली आपली सोय पाहावी. शिदबानें नशापाणी केल्यासही हशम्या जामीन !" आणि मग पंचमंडळी उठली.

शिदबापेक्षां हशम्यानें हाय खाल्ली. त्यानें दुसऱ्या दिवशीं सकाळ-पासूनच शिदबाला ताणून धरलें.

" अर एऽ पोरांनो ! बा संगट चला कीं शेतावर !" त्यानें काशी-गोंद्याला सुनावलें.

शिदबा, हशम्या व पोरें शेताकडे गेलीं.

लक्ष्मीला आनंद वाटला. खूपखूप बरें वाटलें आणि मग जमिनीला तेज चढूं लागलें, तशी शिदबाला ईर्ष्या आली.

पोरांनीं हशम्या मुलाण्याला 'हशम मामा !' म्हणावयास सुरुवात केली.

मास्तरनीं शिदबाला, लक्ष्मीला तालुक्याच्या गांवीं डॉक्टरला दाखवून आणण्यास सांगितलें आणि शिदबानेंही तें तत्काळ ऐकलें.

लक्ष्मीला औषधपाणी मिळूं लागतांच ती सुधारली. हिंडू-फिरूं लागली. घरकाम पाहूं लागली.

आणि एक दिवस बाळा पाटलानें शिदबाची जमीन 'फास' असल्याचें जाहीर केलें.

मृगाच्या सरी कोसळूं लागल्या.

आणि हस्ताचा पाऊस गड् गड् करीत आला व ताड् ताड् जमीन झोडपून निघून गेला.

दसऱ्याच्या महिन्यांतील कोवळीं उन्हें शिदबाच्या हिरव्याचार रानावर चमकूं लागलीं.

गवतानें हिरव्यागार बनून गेलेल्या बांधावरून चरून चरून गंगी तांड बनली. मस्त दिसूं लागली.

"अवंदा गंगी खोंड देतीया जणू !" शिदबा तिच्याकडे पाहून म्हणे



“बरं व्हईल. घरचं जनावर व्हईल शेतकामाला!’ लक्ष्मी म्हणे आणि हा संवाद ऐकणारीं काशी-गोंद्या ही बातमी ऐकून खूष होऊन जात.




दिवाळीच्या आदल्या रात्रीं लामण दिवा घेऊन म्हारीण गंगीच्या गोठ्यांत आली व तिला हळदकुंकूं लावून ‘इडापिडा टळो’ करून ओवाळून गेली.

“पाडव्याला दुपारच येऊन जाऽगऽ!” म्हणून लक्ष्मीनें तिला बजावलें.

दिवाळी दिवशीं ठणक् ठणक् असे टाळ वाजवीत वासुदेव आले व त्यांनीं शिंदबाच्या अंगणांत फेर धरून बळीचें राज्य आल्याची वर्दी दिली.

त्यांच्या उंच टोकदार टोप्यांत मोरपिसें खोवलीं होतीं. भोवतीं छोटे छोटे आरसे बसविले होते. फेऱ्या मारीत असतांना त्यांचे लांब पांढरे झगे वाऱ्यानें फुगत होते.





ग्रंथालय शाखा.
क्र. ७५३८ नों दि. ........
२।५१ ..............



....३२

काशी-गोंद्या ही मौज पाहात उभीं होतीं.

"त्यांना शिदा द्या जी !" लक्ष्मीनें शिदबाला सांगितलें.

शिदबानें नुकतीच आंघोळ आटोपली होती. गळ्यांतील ओली तुळशी-माळ चाचपीत तो लगबगीनें पुढें आला. एका सुपांत त्यानें हरबऱ्याची डाळ व गुळाचा खडा घेऊन तो पुढें आला. "वर्साची फेरी आली जणूं देवा ?' असें म्हणत त्यानें तें भरलें सूप वासुदेवाच्या झोळींत ओतलें.

"बळीचं राज होवो ! धन्याला बरकत येवो ! !" असा गिला करून वासुदेव ठणक् ठणक् करीत चालूं लागले.

काशी-गोंद्या त्यांच्याकडे पाहात उभे राहिले.



BVBK-0404538